Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 27TH JANUARY 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २२ वी माहे डिसेंबर सन १८९७.

**नंबर ९२७०.**—सरकारचा जाहीरनामा **नंबर** ९७२४, तारीख २४ डिसेंबर १८८९, हा रद्द करून व हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट नामक सन १८९४ चा आक्ट ४, याच्या ९ व्या कलमावरून दिलेले अधिकार चालवून, आलीजाह गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, मुंबई बंदराच्या हद्दींत बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याचें नियमन करण्याबाबद पुढील कानू केल्या आहेतः—

**कानू.**

बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याचें नियमन करण्याबाबद गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेल्या, आणि हिंदुस्थान सरकारचे जाहीरनामे **नंबर** १३९३ व १३९४, तारीख ८ जुलै सन १८९७, यांत, व मुंबई सरकारचा जाहीरनामा **नंबर** ९२८३, तारीख १४ मजकूर, यांत प्रसिद्ध केलेल्या कानू १, २, ३, ४, ५ व ७, ह्या, पुढील कानूंस पात्र राहून, मुंबई बंदराच्या हद्दींत बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याच्या बाबतींत लागू असतील असें समजावें.

**कानू (अ)**—कोणत्याही जहाजावर १०० रतलांहून जास्त वजनाचा बारी पदार्थ मालादाखल असून तें जहाज येऊन पोहोंचेल तेव्हां त्याच्या मास्तरानें, त्या जहाजावर पैलट चढला ह्मणजे लगेच त्याला, त्यावर सदरीलप्रमाणें बारी पदार्थ असल्याबद्दल खबर दिली पाहिजे.

**कानू (ब).**—भरसमुद्रांत जाणाऱ्या ज्या कोणत्याहि जहाजावर, **युद्धसामग्रीचा वर्ग ( वर्ग ६ ) याच्या १ल्या भागांतील* बारी पदार्थ खेरीज करून,** १०० रतलांहून जास्त वजनाचे इतर बारी पदार्थ असतील, त्या जहाजानें ते बारी पदार्थ मिडल ग्रौंड ब्याटरीच्या पूर्वेकडील बाजूस मुंबई बंदरांतील तारवांपासून किंवा मुंबई शहरापासून एक मैलाच्या आंत नेतां कामा नयेत; आणि कोणत्याहि जहाजानें सदहू हद्दीच्या आंत, दुसऱ्या कोणत्याही जहाजावरून, **युद्धसामग्रीचा वर्ग ( वर्ग ६ ) याच्या १ ल्या भागांतील * बारी पदार्थ खेरीज करून,** १०० रतलांहून जास्त वजनाचे, किंवा जहाजावर आधींच असलेल्या बारी पदार्थांनिशीं ज्यांचें मान १०० रतलांहून ज्यास्त होईल इतक्या वजनाचे, इतर बारी पदार्थ घेतां कामा नयेत.

**कानू (क)**—भरसमुद्रांत जाणाऱ्या ज्या ज्या जहाजावर **युद्धसामग्रीचा वर्ग ( वर्ग ६ ) याच्या १ ल्या भागांतील*** बारी पदार्थ खेरीज करून इतर बारी पदार्थ १०० रतलांहून जास्त असतील त्या प्रत्येक जहाजावर दिव-

सास फोर ट्रकपाशीं एक चौरस लाल बावटा लावलेला असला पाहिजे, आणि रात्री त्याच ठिकाणीं, कानूंवरहुकुम लावावयाच्या दिव्यांखेरीज आणखी एक लाल दिवा असला पाहिजे; आणि वर सांगितलेले खेरीजकरून इतर बारी पदार्थ मुंबई बंदरांत एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेणाऱ्या कामीं लावलेल्या दरेक जहाजाच्या किंवा होडीच्या दरेक बाजूस पाण्याच्या रेषेच्या वर, एकाद्या फळीवर किंवा इतर प्रकारें, काळ्या जमिनीवर एक फूट लांबीच्या पांढऱ्या अक्षरांनीं रंगानें रंगविलेले **"बारी पदार्थ"** हे शब्द दर्शविलेले असले पाहिजेत. बारी पदार्थ तारवावरून जमिनीवर उतरण्याच्या किंवा तारवावर चढविण्याच्या कामीं लावलेल्या ज्या जहाजांवर व होड्यांवर, सदरीं सांगितलेले खेरीजकरून इतर बारी पदार्थ १०० रतलांहून जास्त असतील त्या जहाजांना व होड्यांना नांगर टाकून राहवें लागेल तेव्हां त्यांनीं बंदरांतील तारवांच्या पूर्वेकडील बाजूस, आणि अशा तारवांपैकीं कोणत्याहि तारवापासून त्याच्या पूर्वेस, निदान अर्ध्या मैलाच्या अंतरावर नांगर टाकून राहिलें पाहिजे.

**कानू** (ड).—संबंध असलेला कन्सैनी, एजंट अगर इतर मनुष्य, यानें **युद्धसामग्रीचा वर्ग ( वर्ग ६ ) याच्या १ ल्या भागांतील* बारी पदार्थ** खेरीजकरून १०० रतलांहून ज्यास्त वजनाचे इतर बारी पदार्थ ज्या कोणत्याहि जहाजावर असतील तें जहाज येऊन पोहोंचण्याचा अजमास असेल त्यापूर्वीं, किंवा असे कोणतेहि बारी पदार्थ तारवावर चढविण्यापूर्वीं ४८ तास त्याबाबद **पोर्ट ऑफिसरास** व **वाटर पोलीसच्या सुपरिंटेंडेंटास** लेखी सूचना दिली पाहिजे; आणि असे बारी पदार्थ **मागझीनमध्यें** ठेवण्यांत येत तोंपर्यंत किंवा ज्या जहाजावर ते असतील तें जहाज सफरीवर जाण्यास निघे तोंपर्यंत ते ताब्यांत घेऊन राहण्यासाठीं सदरील **सुपरिंटेंडेंटानें** एक **स्पेशल अमलदार** नेमला पाहिजे.

**कानू** (इ).—कोणत्याहि एका जहाजांतून किंवा होडींतून कोणत्याहि एका वेळीं न्यावयाचे बारी पदार्थ, त्या जहाजास किंवा होडीस **पोर्ट ऑफिसरानें** पसंत केला आहे असा बंद केलेला डेक नसेल तर एकंदर मिळून ९६० रतलांहून ज्यास्त असतां कामा नयेत.

डेक असलेल्या कोणत्याहि होडीनें किंवा जहाजानें एका वेळीं ९० टनांहून ज्यास्त बारी पदार्थ नेतां कामा नयेत. हा नियम भरसमुद्रांत जाणाऱ्या जहाजांस लागू नाहीं.

**कानू** (फ).—**पोर्ट ऑफिसरास** योग्य वाटेल त्या त्या प्रसंगीं तो, कोणतीहि युद्धसामग्री पेट्यांमध्यें योग्य रीतीनें बंद केलेली असून त्या पेट्यांची संख्या ५० हून ज्यास्त नसेल तेव्हां ती युद्धसामग्री, नेहमींच्या नांगरण्याच्या जागीं असणाऱ्या कोणत्याहि जहाजावर, तें जहाज हंकारून जावयाचें असेल त्या दिवशीं अगर त्याच्या पूर्वींच्या दिवशीं, चढविण्याची परवानगी देण्यास मुखत्यार आहे. युद्धसामग्री तारवावर चढविणें ती, या कानूंमध्यें जी सावधगिरी व ज्या शर्ती सांगितल्या आहेत त्याच सावधगिरीनें व त्याच शर्तींवर चढविली पाहिजे, या कानूअन्वयें जी युद्धसामग्री तारवावर चढविण्याची परवानगी मिळाली असेल ती युद्धसामग्री नेणारी होडी जहाजाच्या बाजूस जातांच तावडतोब ती सामग्री जहाजावर घेतली पाहिजे. आणि ज्या मालाच्या होडीवर अगर इतर जहाजावर विस्तव असेल त्या होडीस अगर जहाजास, सदर्हूप्रमाणें युद्धसामग्री चढविण्यांत येत असतांना, ती जहाजाच्या ज्या बाजूनें चढविण्यांत येत असेल त्या बाजूस राहूं दिलें जाणार नाहीं.

**कानू** (ग).—जर कोणताहि मनुष्य सदरील कानू (अ) तागाईत (फ) यांपैकीं कोणत्याहि कानूचें उल्लंघन करील तर तो पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंड केला जाण्यास पात्र होईल.

*भाग १.—सेफ्टी काडतुसें, सुरुंग लावण्याकरितां सेफ्टी फूजी, रेलवेच्या धुक्याच्या सिग्नलीं, तोट्या, कुलपी गोळ्यांकरितां फूजी, बंदुकींकरितां फ्रिक्शन ट्यूब्स; मात्र इतकेंच कीं कोणत्याहि एका प्याकेजांत ९ हून जास्त फूजी किंवा २९ हून जास्त ट्यूब्स असतां कामा नयेत, आणि तें प्याकेज हवा आंत न जाई अशा प्रकारें बंद केलेलें धातूचें सिलिंडर असलें पाहिजे.

आलीजा धि रैट ऑनरेबल धि गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मान्टीथ,

चीफ् सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख ३० माहे आक्टोबर सन १८९७.

नंबर ७८८८.—हिंदुस्तान सरकारचे खालील जाहिरनामे पुनः प्रसिद्ध केले आहेत:—

"फिनान्स अँड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हेन्यू.

---

स्टांप.

मुकाम सिमला, तारीख २२ माहे आक्टोबर सन १८९७.

नंबर ४७१८ एस्. आर.—सन १८७९ चा हिंदुस्तानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याच्या ९ व्या कलमावरून दिलेला अधिकार चालवून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनी खालील कानू केली आहे:—

असलबरहुकूम नकल ह्मणून दाखला दिलेल्या नकाशांच्या किंवा प्लानांच्या नकलांवर सन १८७९ चा हिंदुस्तानचा स्टांप आक्ट याच्या पहिल्या परिशिष्टापैकीं २२ व्या आर्टिकलाअन्वयें द्यावयाची स्टांप ड्यूटी, आठ आणे किंमतीच्या चिकटणाऱ्या कोर्ट फी स्टांपानें दर्शविली पाहिजे.

नंबर ४७२० एस्. आर., नंबर ४७२२ एस्. आर., आणि नंबर ४७२४ एस्. आर.—[मुंबई इलाक्यास लागू नसल्या कारणानें ह्यांचा तरजुमा केला नाहीं].

(सही) जे. एफ्. फिनले,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार."

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मॉण्टीथ,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.